# महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.
☎ - ०२२- २३७६ ०८७१, ✉ - spcstdcest३@gmail.com


क्रमांक :- रासआ/मुख्या-४/आस्था-२/राज्यकर सहआयुक्त/ज्येष्ठता-२०२६/राउआ/ब-378 मुंबई, दि- 07.04.2026

प्रति,
सर्व आरस्थापना अधिकारी,
वस्तू व सेवाकर विभाग.

विषय : वस्तू व सेवा कर विभागातील राज्यकर सहआयुक्त संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. विज्येसू ११२६ /प्र.क्र.०८/वि.प्र.-३, (ई-१५८९५११) दि. १८/०३/२०२६

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकानुसार शासनाने वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर सहआयुक्त संवर्गाची दि. ०१/०१/२०२६ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द केलेली आहे.

सदर ज्येष्ठतासूची वस्तू व सेवाकर विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर ज्येष्ठतासूचीची प्रत या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावी व आपल्या कार्यालयातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावी आणि त्यांच्या स्वाक्षऱ्या आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवण्यात याव्यात. तसेच ज्येष्ठतासूची संदर्भात काही त्रुटी/उणिवा/आक्षेप असल्यास किंवा नसल्यास या कार्यालयास ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करण्यात यावेत. सदर आक्षेप या कार्यालयास १५ दिवसांचे आत सादर न केल्यास आपल्या कार्यालयाचे कोणतेही आक्षेप नसल्याचे गृहित धरून ज्येष्ठतासूची अंतिम करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. विहित मुदतीनंतर या कार्यालयास आक्षेप प्राप्त झाल्यास व ज्येष्ठतासूचीमध्ये सदर आक्षेपाची नोंद न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आस्थापना अधिकारी यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(संजय निकम)
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५३|५

वस्तू व सेवा कर विभागातील राज्यकर सह आयुक्त संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : विज्येसू ११२६/प्र.क्र.०८/वि.प्र.- ३,(ई-१५८९५११)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ मार्च, २०२६.

वाचा :-

१. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/१२, दिनांक २१/०६/२०२१.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक विज्येसू-११२५/प्र.क्र.२२/वि.प्र.-३, दिनांक ११/०९/२०२५.

-: परिपत्रक :-

शासन सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिद्ध करणे याबाबतचे सर्वंकष धोरण संदर्भ क्र.१ येथील शासन अधिसूचनेन्वये विहित करण्यात आले आहे. त्यानुसार वस्तू व सेवा कर विभागातील राज्यकर सह आयुक्त संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२५ रोजीची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची संदर्भ क्र. २ नुसार प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील नियम ५ (१) नुसार वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर सह आयुक्त संवर्गात दिनांक ०१/०१/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीत पदोन्नतीने नियुक्त झालेल्या अधिका-यांची दिनांक ०१/०१/२०२६ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची सोबतच्या परिशिष्ट "अ" नुसार पुढील अटींच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ) सदर ज्येष्ठतासूची राज्यकर सह आयुक्त पदावरील पदोन्नतीच्या निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ब) ज्या अधिकाऱ्यांच्या जातीप्रमाणपत्रांची पडताळणी अभावी किंवा अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित/प्रलंबित आहे या कारणास्तव नियमित पदोन्नतीचे आदेश अद्याप निर्गमित केलेले नाहीत, अशा अधिकाऱ्यांची नावे या ज्येष्ठतासूचीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यांचे नियमित पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्यांचा ज्येष्ठतासूचीत यथास्थिती समावेश करण्यात येईल.

क) ही ज्येष्ठतासूची वस्तू व सेवा कर विभागातील विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये झालेल्या निर्णयानुसार कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठतेत झालेला बदल विचारात घेऊन सदर ज्येष्ठतासूचींतील अधिका-यांचा ज्येष्ठताक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. ही ज्येष्ठता सूची मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन तसेच भविष्यात निवडसूचीत बदल झाल्यास त्यामध्ये बदल करण्याच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ड) सदर ज्येष्ठता सूची तयार करताना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली २०२१ मधील नियम व तरतूदी विचारात घेवून अधिकाऱ्यांची ज्येष्ठता, निवडसूचीतील क्रमांकानुसार तयार करण्यात आली आहे. त्यांच्या नावासमोर नमूद दिनांक फक्त राज्यकर सह आयुक्त या पदाच्या ज्येष्ठतेसाठी धरण्यात येईल. इतर कोणत्याही आर्थिक लाभांसाठी तो दिनांक गृहीत धरला जाणार नाही.

४. राज्यकर आयुक्तांनी ही ज्येष्ठता यादी राज्यकर सह आयुक्त संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांसह) निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी व सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घेतल्याची पोचपावती त्यांच्या अभिलेखात ठेवावी. ज्येष्ठतासूची संदर्भात त्रुटी/उणिवा/आक्षेप असल्यास संबंधित अधिका-यांनी ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत संबंधित कार्यालयामार्फत राज्यकर आयुक्त कार्यालयात सादर करावेत. राज्यकर आयुक्त कार्यालयाने प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप/त्रुटींची तपासणी करुन एकत्रित प्रस्ताव सविस्तर अभिप्रायासह शासनास तात्काळ सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भाग्यदेवरे

(भाग्यश्री देवरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
२) विशेष राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई
३) वस्तू व सेवाकर विभागातील सर्व अपर राज्यकर आयुक्त.
४) राज्यकर उपआयुक्त (जनसंपर्क) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सर्व संबंधित अधिकारी (विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत)
६) कार्यासन अधिकारी, (विप्र-१/विप्र-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती वि.प्र. ३.

परिशिष्ट - "अ"

वित्त विभाग परिपत्रक क्र. विज्येसू-११२६/प्र.क्र.०८/वि.प्र.३, दिनांक १८ मार्च, २०२६ सोबतचे सहपत्र

वर्गाचे नाव - राज्यकर सह आयुक्त

२. वेतनश्रेणी - एस-२५, ₹ ७८८००-२०९२००

राज्यकर सह आयुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०२५ ते दिनांक ३१.१२.२०२५ या कालावधीत कार्यरत कर्मचा-यांची दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची

| अ.क्र | अधिका-यांचे नाव | | नियुक्ती प्रकार | जन्मतारीख | प्रवर्ग | नियुक्ती दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. | विजय गोपाळराव काळे | प | २०.१०.१९६८ | खुला | ०२.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ | ३१.१०.२०२६ | -- |
| २ | श्री. | राजेंद्र सदाशिव सरवदे | प | ०१.०६.१९७१ | भज-क | २९.१०.२०२५ | २४.१०.२०२५ | ३१.०५.२०२९ | -- |
| ३ | श्री. | राजेंद्र आबासाहेब देशमुख | प | २३.०६.१९७५ | खुला | ३०.१०.२०२५ | २४.१०.२०२५ | ३०.०६.२०३३ | -- |
| ४ | श्री. | महेश मधुकर जगताप | प | ११.०४.१९७४ | खुला | १०.११.२०२५ | २४.१०.२०२५ | ३०.०४.२०३२ | -- |
| ५ | श्री. | उमेश शिवाजीराव वाघ | प | ०४.११.१९६९ | खुला | २४.१०.२०२५ | २४.१०.२०२५ | ३०.११.२०२७ | -- |
| ६ | श्री. | विनायक शहाजी माने | प | १५.०७.१९७६ | खुला | ०६.११.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३१.०७.२०३४ | -- |
| ७ | श्री. | आनंद उत्तमराव पाटील | प | ०८.०३.१९७४ | भ.ज.ड | १७.११.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३१.०३.२०३२ | -- |
| ८ | श्री. | विजय एकनाथ कुंभार | प | ०२.११.१९७४ | इ.मा.व | ०१.११.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३०.११.२०३२ | -- |
| ९ | श्री. | प्रशांत शाळीग्राम पाटील | प | ०१.०६.१९७४ | इ.मा.व | ११.११.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३१.०५.२०३२ | -- |
| १० | श्री. | मधुकर लोटन पाटील | प | २४.१२.१९७१ | इ.मा.व | १७.११.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३१.१२.२०२९ | -- |
| ११ | श्री. | पराग दिवाकर महाजन | प | १४.०५.१९७३ | इ.मा.व | ३१.१०.२०२५ | ३१.१०.२०२५ | ३१.०५.२०३१ | -- |
| १२ | श्रीमती | सुषमा राजेंद्र मगर (पूर्वाश्रमीच्या कुमारी सुषमा प्रल्हाद जगताप) | प | १६.११.१९७२ | खुला | ०३.११.२०२५ | ०३.११.२०२५ | ३०.११.२०३० | -- |
| १३ | श्रीमती | नयना मंगेश गोंदावले (पुर्वाश्रमीच्या कुमारी नयना मारुती मणियार) | प | १२.०४.१९७३ | खुला | ०४.११.२०२५ | ०३.११.२०२५ | ३०.०४.२०३१ | -- |
| १४ | श्रीमती | सरोज प्रशांत महावोले (पुर्वाश्रमीच्या कुमारी सरोज दत्तात्रय थोरात) | प | ०८.१०.१९७४ | इ.मा.व | ०३.११.२०२५ | ०३.११.२०२५ | ३१.१०.२०३२ | -- |
| १५ | श्रीमती | कविता राजीव तांवे | प | २५.०८.१९६८ | खुला | २०.११.२०२५ | २०.११.२०२५ | ३१.०८.२०२६ | |